**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**


**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि. ११ एप्रिल २०२६

## महानगरपालिकेच्या विविध विकास प्रकल्पांची मा.आयुक्त महोदयांकडून पाहणी

वसई–विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सुरू असलेल्या तसेच पूर्णत्वाच्या मार्गावर असलेल्या विविध विकास कामांची व प्रकल्पांची शनिवार दिनांक ११ एप्रिल रोजी मा.आयुक्त श्री. पृथ्वीराज बी. पी. (भा.प्र.से.) यांनी पाहणी करून कामांचा सविस्तर आढावा घेतला.

या पाहणी दौऱ्याची सुरुवात प्रभाग समिती ए मधील बोळींज येथील मलनिस्सारण केंद्र  STP-2 प्लांट येथून करण्यात आली. सदर मलनिस्सारण केंद्राबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेऊन मा.आयुक्त महोदयांनी संबंधितांना विविध सूचना दिल्या.

त्यानंतर विरार पश्चिमेकडे प्रगती पथावर असलेल्या स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स च्या कामाची पाहणी मा.आयुक्त महोदयांनी केली. खेळाडूंसाठी उपलब्ध सुविधा व क्रीडा विकासाच्या दृष्टीने सुरू असलेल्या कामांची पाहणी करीत आवश्यक त्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

अमृत २ योजने अंतर्गत पाणीपुरवठा बळकटीकरण करणे कामी सुरू असलेल्या तुळींज जीएसआर व बिलालपाडा येथील मुख्य जलवाहिनी टाकण्याच्या सुरू असलेल्या विकास कामास मा.आयुक्त यांनी भेट देऊन पाहणी केली.

त्याचप्रमाणे अमृत २ योजने अंतर्गत सेंट्रल पार्क येथे टाकण्यात येत असलेल्या मलवाहिनीची पाहणी यावेळी करण्यात आली.

त्याचप्रमाणे कॅपिटल मॉलच्या बाजूला सुरू असलेल्या मलनिस्सारण केंद्राच्या कामास तसेच मायक्रो ट्यूनलिंग micro tunneling च्या कामासही मा.आयुक्त महोदयांनी भेट देऊन कामाची पाहणी केली. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रकल्पाची माहिती सादर करण्यात आली.

तद्नंतर मजेठीया, नालासोपारा पूर्व येथील पूर्णत्वाच्या टप्प्यात असलेल्या नाट्यगृहाची मा.आयुक्तांनी पाहणी केली व येथील आसन व्यवस्थेचा, विविध तांत्रिक बाबींचा आढावा घेतला.

नाट्यगृहाला लागूनच असलेल्या वाचनालयालाही मा.आयुक्त महोदयांनी भेट देत येथील व्यवस्थेचा आढावा घेतला व उपस्थित विद्यार्थी वर्गाशी संवाद साधत त्यांचे प्रश्न जाणून घेतले व त्यावर उपाययोजना करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच तेथीलच आरोग्य केंद्रालाही मा.आयुक्त महोदयांनी भेट देत येथील कामासंबंधी येथील कर्मचाऱ्यांकडून माहिती घेतली

पुढे आचोळे येथील प्रस्तावित रुग्णालयाच्या जागेची पाहणी करून संबंधित अधिकारी व अभियंत्यांकडून प्रकल्पासंदर्भातील कामकाजाची माहिती मा.आयुक्तांनी घेतली.

शहरातील नागरिकांना जलदगतीने उत्कृष्ट सेवा सुविधा मिळाव्यात याद्दष्टीने महानगरपालिकेचे प्रस्तावित व सुरू असलेले प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण व्हावेत या भावनेने मा.आयुक्त श्री.पृथ्वीराज बी.पी.(भा.प्र.से.) यांनी शनिवारी सुट्टीच्या दिवशी व भर उन्हात हा पाहणी दौरा केला. या पाहणी दौऱ्यावेळी मा.अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे, मा. प्र.शहर अभियंता श्री. प्रदीप पाचंगे, कार्यकारी अभियंता श्री.संजय कुलकर्णी, प्र.कार्यकारी अभियंता श्री.सुरेंद्र ठाकरे, प्र.कार्यकारी अभियंता श्री.अमोल जाधव, उप अभियंता श्री.सतीशकुमार सूर्यवंशी, संबंधित प्रभागाचे सहाय्यक आयुक्त, अभियंते, विभाग प्रमुख इतर संबंधित अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.